# मुंबई विद्यापीठ

**निवडणूक विभाग**

क्र.नि.वि./आयसीडी/२०२३—२४/८३.

**परिपत्रक :—**

विषय :— अधिसभा/विद्यापरिषद आणि अभ्यासमंडळांकरिता विविध मतदार संघतील निवडणूक नामनिर्देशन अर्जांची छाननीकरिता उपस्थित रहाणेबाबत.

संदर्भ :— १. निवडणूक अधिसुचना क्र.नि.वि./आयसीडी/२०२३—२४/५३ दि. २९ मे, २०२३.

२. निवडणूक अधिसुचना क्र.नि.वि./आयसीडी/२०२३—२४/४८ दि. २९ मे, २०२३.

३. निवडणूक अधिसुचना क्र.नि.वि./आयसीडी/२०२३—२४/४९ दि. २९ मे, २०२३.

४. निवडणूक अधिसुचना क्र.नि.वि./आयसीडी/२०२३—२४/५२ दि. २९ मे, २०२३.

५. निवडणूक अधिसुचना क्र.नि.वि./आयसीडी/२०२३—२४/५० दि. २९ मे, २०२३.

६. निवडणूक अधिसुचना क्र. नि.वि./आयसीडी/२०२३—२४/५१ दि. २९ मे, २०२३.

आपणांस या परिपत्राकाद्वारे कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद आणि अभ्यासमंडळावरील प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि विभाग प्रमुख या मतदार संघाच्या निवडणूकीसाठी नामनिर्देशन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशन अर्जांची छाननी सोमवार, दि. १२ जून, २०२३ रोजी सर फिरोजशहा मेहता, व्यवस्थापन परिषद सभागृह, कक्ष क्र. १०५, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२ येथे होणार असून छाननीकरिताची वेळ पुढिलप्रमाणे आहेत :—

| अनु. क्र. | मतदार संघ | जिल्हा | उपस्थितीची वेळ |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि विभाग प्रमुख | रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग | सकाळी ११:०० वा. |
| २. | प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि विभाग प्रमुख | मुंबई—उपनगर, ठाणे आणि पालघर | सकाळी १२:०० वा. |
| ३. | प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि विभाग प्रमुख | मुंबई शहर | दुपारी २:०० वा. |

नामनिर्देशन अर्जदारांनी उपरोक्त दिनांकास व दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे. तसेच नामनिर्देशन छाननीकरिता उपस्थित रहातेवेळी संदर्भीय निवडणूक अधिसुचनेनुसार छाननीच्या वेळी मुळ प्रमाणपत्र/कागदपत्र सादर करावीत.

स्वाक्षरीत/—
(प्रा. सुनिल भिरूड)
**प्र. कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

दि. ७ जून, २०२३.
ठिकाण : मुंबई

सोबत :— नमुना ‘क’ जोडले आहे.

# नामनिर्देशन अर्जाच्या छाननी/मतमोजणीकरीता महत्वाच्या सूचना :-

(१) नामनिर्देशन अर्जाची छाननी करताना उमेदवार स्वत:/ सुचक/ अनुमोदक किंवा प्रतिनिधी जो विशिष्ट मतदार संघाचा मतदार असेल यांपैकी कुणीही एक, कुलसचिव-तथा-निवडणूक अधिकारी यांनी लेखी पत्राद्वारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ती म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

(२) उमेदवार स्वत: हजर राहु शकत नसल्यास तसा अर्ज कुलसचिव-तथा-निवडणुक निर्णय अधिकारी यांना एक तास अगोदर द्यावा. त्यावर सूचक / अनुमोदक किंवा प्रतिनिधीचे नाव, मतदार यादीतील क्रमांक आणि स्वत:ची व सूचक / अनुमोदक किंवा प्रतिनिधीची स्वाक्षरी असावी. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

(३) उमेदवार स्वत: उपस्थित राहणार असल्यास अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

(४) अर्ज केल्यावर निवडणुक विभागातुन ओळख पत्र देण्यात येईल. (सोबत ओळख पत्रासाठी दोन (२) पासपोर्ट साईज फोटो आणणे) ओळख पत्राशिवाय कुणालाही आत प्रवेश करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

(५) उमेदवाराने नामनिर्देशनासंबंधी आवश्यक ती कागदपत्रे छाननीच्या वेळेस स्वत:जवळ बाळगावीत. (नामनिर्देशन अर्जातील शपथ पत्रामध्ये दिलेल्या पात्रते संबंधी उपस्थितांमधील कुणीही आक्षेप घेतल्यास व संबंधीत कागदपत्रांची मागणी केल्यास त्या उमेदवारास त्याचवेळी कागदपत्र सादर करावे लागतील. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.)

(६) उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी, जो विशिष्ट मतदार संघाचा मतदार असेल आणि लिखित स्वरूपात यथोचितरित्या त्याच्यावतीने प्राधिकृत केलेला असेल, फक्त त्यास मतमोजणीच्या कालावधीमध्ये हजर राहण्यास परवानगी देण्यात येईल. तसेच उमेदवार किंवा त्याने प्राधिकृत केलेला प्रतिनिधी आणि निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्यक्ती / अधिकारी व कर्मचारी व्यतीरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस मतमोजणीच्या ठिकाणापासून पुरेशा अंतराच्या परिघाच्या आत येण्यास अनुमती देण्यात येणार नाही.

(७) प्रवेशपत्र हे अहस्तांतरणीय असेल, उल्लंघन केल्यास उमेदवार अथवा त्याचा प्रतिनिधी कारवाईस पात्र ठरेल.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

# मुंबई विद्यापीठ

## नामनिर्देशन अर्ज छाननी/मतमोजणीकरीता प्रतिनिधी नेमणूक करणे, नमुना 'क'

दिनांक :

प्रति,
कुलसचिव-तथा-निवडणुक निर्णय अधिकारी,
मुंबई विद्यापीठ,
फोर्ट, मुंबई- ४०० ०३२

विषय :- ........................................ मतदार संघाच्या निवडणुकीसाठी दि. १२/०६/२०२३ रोजी नामनिर्देशन अर्ज छाननी करीता प्रतिनिधींची नेमणुक करणे बाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन मी आपणांस विनंती करतो/करते की नामनिर्देशन अर्ज छाननीकरीता श्री/श्रीमती/कु ................................................................ यांची प्रतिनिधी म्हणुन नेमणुक करावी.

| प्रतिनिधीचा फोटो |
|---|

प्रतिनिधींचे नाव:- श्री/श्रीमती/कु --------
------------------------------------

मतदार क्रमांक :- -------------------- आपला विश्वासु

स्वाक्षरी:- ---------------------------

(उमेदवाराचे नाव व सही)

---------------------------------------------------------------------------

## नामनिर्देशन छाननीसाठी ओळखपत्र नमुना

**ओळख पत्र/प्रवेश पत्र**
**मुंबई विद्यापीठ**
**निवडणुक विभाग**

नांव :- श्री/कु/श्रीमती---------
------------------------------------

| फोटो |
|---|

मतदान केंद्र:-
मतदार क्रमांक :- (स्वाक्षरी)
दिनांक :-

कुलसचिव तथा निवडणुक निर्णय अधिकारी (हस्तांतरणीय नाही)